# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२९५१६२६४ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१४/११/२०२५

### जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१४/११/२०२५ ते १८/११/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 30 | 31 | 31 | 30 | 30 |
| किमान तापमान (अं.से.) | 9 | 8 | 8 | 9 | 10 |
| ढग स्थिती (आकाश) | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 76 | 73 | 73 | 73 | 75 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 46 | 45 | 45 | 43 | 44 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 5 | 7 | 6 | 7 | 7 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 360 | 96 | 79 | 75 | 96 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १४ ते १८ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १५, १६ व १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी शीत लहर येण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १६ ते २२ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • किमान तापमान कमी राहण्याची शक्यता असल्याने बागेस/ पिकास रात्रीच्या वेळी पाणी पुरवठा करावा.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• कोणत्याही पिकावर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना, त्या पिकाकरिता त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• सूक्ष्म पोषक पावडर फुले ग्रेड I याचा जमिनीतून वापर पेरणीच्या वेळी करा वा. फुले ग्रेड II हे द्रव सूक्ष्म पोषक मिश्रण आहे जे विशेषतः पानांवर वापरण्यासाठी १% तीव्रतेची शिफारस केलेले आहे. त्यासाठी पहिली फवारणी पेरणीनंतर सुमारे ३०-४५ दिवसांनी करावी. दुसरी फवारणी हि पहिल्या फवारणीनंतर |

| | | |
|---|---|---|
| | | १५-२० दिवसांनी पुन्हा करावी. ग्रेड I चा मातीत वापर आणि ग्रेड II चा पानांवरील फवारण्या एकत्रित केल्याने पिकाच्या वाढीच्या काळात सूक्ष्म पोषक घटकांची त्वरित आणि शाश्वत उपलब्धता सुनिश्चित होते , ज्यामुळे पिकाची चांगली वाढ , उत्पादन आणि गुणवत्ता मिळते. रब्बी पिके जसे ज्वारी, हरभरा, गहू इ. पिकांच्या पेरणीच्या वेळेस वापरावे. |
| **गहू** | पुर्वतयारी/ पेरणी | बागायती गव्हाची वेळेवर पेरणीची योग्य वेळ म्हणजे नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा. या कालावधीत पेरणी केल्यास गव्हाचे उत्पादन चांगले येते. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम २५ टक्के डब्लु.एस. बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करून बियाणे वाळल्यानंतर प्रती किलो बियाण्यास २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणाऱ्या जीवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी. पेरणी करिता सुधारित वाण जसे फुले समाधान, एम ए सी एस ६२२२, गोदावरी, पंचवटी इ. वाणांची निवड करावी. |
| **कापूस** | वेचणी अवस्था | शेतातील अंदाजे ३० ते ३५ टक्के बोंडे फुटल्यावर पहिली वेचणी करावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने २ ते ३ वेचण्या कराव्यात. वेचल्यानंतर कापूस ३ ते ४ दिवस उन्हात वाळवून स्वच्छ व कोरड्या जागेत साठवावा. |
| **सोयाबीन** | साठवणूक अवस्था | काढणी केलेले पीक प्रखर सूर्यप्रकाशात शेतातच वाळवून स्वच्छ व कोरड्या जागेत साठवावेत. काढणी/मळणी केलेले पीक शेड मध्ये किंवा प्लास्टीकच्या कागदाने सुरक्षित झाकून ठेवावीत. |
| **मका** | दाणे भरण्याची अवस्था | उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. |
| **हरभरा** | पीक वाढीची अवस्था | हरभरा पिकाच्या जोमदार वाढीसाठी शेत सुरुवातीपासूनच तणविरहीत ठेवावे. पिक २० दिवसाचे झाल्यानंतर पहिली कोळपणी करावी आणि पिक १ महिन्याचे असताना दुसरी कोळपणी करावी. कोळपणी शक्यतो वापसा असताना करावी. कोळपणी नंतर एक खुरपणी करावी. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | किमान तापमान १० अंश सें. च्या खाली राहण्याची शक्यता असल्याने बागेत रात्रीच्या वेळी पाणी पुरवठा करावा. भल्या पहाटे बागेत ओला पाला पाचोळा जाळून धूर करावा. केळीच्या झांडास पीक अवस्थेनुसार प्रति झाड २५० ते १००० ग्रॅम निंबोळी ढेप द्यावी. घडास ६ % सच्छिद्रतेचे पांढऱ्या प्लॅस्टिक बॅगचे आवरण करावे. सध्याच्या हवामानामुळे करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून बागेबाहेर जाळावीत तसेच केळीची पिल्ले धारदार कोयत्याने नियमित काढावीत. तसेच मेटीरम ५५ टक्के + पायऱ्याक्लोस्ट्रोबिन ५ टक्के (६० टक्के डब्लु जी) ३० ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी . त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. जनावरांना मोकळया जागेत बांधू नये. त्यांना गोठा , शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे. ढगाळ वातावरण व वाढलेल्या आद्रतेमुळे बाह्य परोपजीवी (उवा , पिसवा, गोचीड व चावणाऱ्या माशा) कीटकांचा प्रादुर्भाव वाढला असून त्यांच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्क किंवा वनस्पतीजन्य कीटकनाशक (कडुनिंब तेल १५ मिली + करंज तेल १५ मिली + २ ग्रॅम साबण १ लिटर पाणी) हे द्रावण आठवड्याच्या अंतराने प्रशुधनावर , गोठ्यामध्ये, सभोवताली असलेले पाण्याचे डबके/खाच खळगे/नाली व उकंड्यावर फवारावे. हे वनस्पतीजन्य कीटकनाशक किटरोधक व गोचिडांचे जीवनचक्र तोडून त्यांची संख्या घटविण्यासाठी मदत करतात. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :-

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १४.११.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**